**पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि राष्ट्राध्यक्ष मॅक्रॉन यांमध्ये दूरध्वनी संवाद**

21 ऑगस्ट 2025

आज पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि फ्रान्सचे महामहिम राष्ट्राध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रॉन यांच्यामध्ये दूरध्वनी द्वारे चर्चा पार पडली.

युक्रेन आणि पश्चिम आशियातील संघर्षांच्या शांततापूर्ण निराकरणासाठी सुरू असलेल्या प्रयत्नांवर नेत्यांनी विचारांचे आदान-प्रदान केले.

राष्ट्राध्यक्ष मॅक्रॉन यांनी वॉशिंग्टन मध्ये युरोप, अमेरिका आणि युक्रेनच्या नेत्यांमध्ये नुकत्याच पार पडलेल्या बैठकीबाबत अवगत केले. त्यांनी गाझामध्ये परिस्थितीविषयी आपला दृष्टीकोन देखील सामायिक केला.

पंतप्रधान मोदींनी संघर्षांचे शांततापूर्ण निराकरण आणि शांतता तसेच स्थैर्य लवकरात लवकर पुर्नस्थापित करण्यासाठी भारताच्या सातत्यपूर्ण पाठिंब्याचा पुनरुच्चार केला.

व्यापार, संरक्षण, नागरी आण्विक सहकार्य, तंत्रज्ञान आणि ऊर्जा या क्षेत्रांसह द्विपक्षीय सहकार्य कार्यक्रमातील प्रगतीचा देखील नेत्यांनी आढावा घेतला. उभय नेत्यांनी भारत-फ्रान्स धोरणात्मक भागीदारी बळकट करण्यासाठी आणि वर्ष 2026 हे उचित पद्धतीने 'नवोपक्रमाचे वर्ष' म्हणून साजरे करण्याच्या वचनबद्धतेची पुष्टी केली.

राष्ट्राध्यक्ष मॅक्रॉन यांनी भारत आणि EU दरम्यान मुक्त व्यापार करार साठी लवकरात लवकर तोडगा काढण्यासाठी पाठिंबा दर्शविला.

उभय नेत्यांनी परस्परांच्या संपर्कात राहण्याविषयी सहमती दर्शविली.

**नवी दिल्ली**

21 ऑगस्ट 2025